जळगाव दि.१५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात स्व. बाळासाहेब ठाकरे सेंटर ऑफ एक्सलेंस इन जर्नालिझम उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मंत्रीमंडळाच्या बैठकीत तत्वत: प्रशासकीय मान्यता दिली आहे.

या संदर्भात दि. १४ ऑक्टोबर रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक डॉ. सुधीर भटकर यांनी विद्यापीठात स्व. बाळासाहेब ठाकरे सेंटर ऑफ एक्सलेंस इन जर्नालिझम उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे पत्र दिले होते. त्या अनुषंगाने दि. १४ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीत हे सेंटर उभारण्यासाठी २५ कोटी रुपयांच्या कामांना तत्वत: प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यामध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे सेंटर ऑफ एक्सलेंस इन जर्नालिझम भवनाच्या बांधकामासाठी ८ कोटी, वसतिगृहाच्या बांधकामासाठी ७ कोटी, दृकश्राव्य केंद्र उपकरणे खरेदीसाठी ५ कोटी आणि या केंद्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्यासाठी तसेच आवश्यक मनुष्यबळ पुरविण्यासाठी ५ कोटी अशा एकूण २५ कोटींच्या कामांना तत्वत: प्रशासकीय मान्यता दिली आहे. राज्यशासनाने प्रशासकीय मान्यता दिल्याबद्दल कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.सुधीर भटकर यांनी शासनाचे आभार मानले आहेत.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत कार्यरत असलेल्या बौद्ध अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांचे 'मन आणि बौद्ध तत्वज्ञान' या विषयावर विचारधारा प्रशाळेच्या सभागृहात चर्चासत्र व गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते.

यात प्रा. अनिल डोंगरे यांनी, अभिधम्मपिटकमध्ये बुद्धांनी मनासोबत जोडलेल्या भावनांवर विमोचन केले. त्यात विशेषत्वाने मनाचा संबंध हा नाम आणि रूपाने समजतो. नाम हे मानसिक तर रूप हे शारीरिक आहे याचा बुद्धांच्या तत्वज्ञानातील पाच स्कदांमध्ये समावेश करण्यात आलेला असल्याचे सांगितले. यासोबतच्या मनाच्या ८९ अवस्थांची त्यांनी थोडक्यात मांडणी केली. त्याचा विज्ञानाशी कसा संबंध येतो हे डोळे, कान, गंध, त्वचा, मनाचे उदाहरण देऊन स्पष्ट केले. तथागतच्या वैज्ञानिक दृष्टिकोनावर प्रकाश टाकून तथागत हे एक महान वैज्ञानिक असल्याचा विचार स्पष्ट केला. जसे समोर एखादे फुल आहे ते आपण डोळ्यांनी पाहतो पाहण्याची क्रिया आणि डोळा यांच्या मधील अंतरास आपण आयतन म्हणतो. असे समजावण्याचा प्रयत्न केला.

यावेळी विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांनी पृथ्वी, आप, तेज, वायू हे चार घटक मिळून एक स्कंद तयार होतो. हे घटक स्वतंत्र पणे निर्जीव आहेत पण त्यांच्या एकत्र येण्यातून संज्ञा तयार होते असे प्रतिपादन केले. तसेच उपरोक्त आयतनाविषयी प्रा.पगारे यांनी सविस्तर पणे समजावण्याचा प्रयत्न केला.

सोबतच संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके यांनी सहा आयतने आणि त्यांच्या शाखा यांवर संगणकीय दृष्ट्या एक स्वतंत्र प्रोग्राम तयार केलेला असल्याची माहिती दिली. या प्रोग्राम मध्ये बौद्ध तत्वज्ञानातील ८९ घटकांचे विश्लेषण करण्यात आलेले असल्याने ते वाचकांच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. असा विश्वास दर्शविला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बौद्ध अध्ययन व संशोधन केंद्राचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष खिराडे यांनी केले.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १५ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी